दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे    संपादक : बंडूभाऊ इंगोले

वाशीम ■ शुक्रवार दिनांक 25 एप्रिल 2025 ■ वर्ष : 1 ले ■ अंक : 333 ■ पाने : 4  किंमत : 5 रुपये  Title code:- MAHMUL03935

## महत्त्वाचे...



### शनिवारी खामगाव येथे काँग्रेसची भव्य सद्भावना संकल्प सभा

खामगाव : बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने येत्या २६ एप्रिल शनिवार रोजी खामगाव येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत भव्य सद्भावना संकल्प सभेचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांपासून समाजातील जातीय तसेच धार्मिक विद्वेष वाढत चालला आहे. दहशतवादी हल्ल्यांमध्ये निष्पाप नागरिकांचा बळी जात असून देशाच्या शत्रूंकडून सुरक्षिततेला आव्हान दिल्या जात आहे. तसेच अनेक माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटना घडत असून देश व महाराष्ट्र अस्थीर करण्याचे काम केल्या जात आहे. समाज एकसंघ असावा, तिथे जातीय तसेच धार्मिक द्वेषाला, तिरस्काराला काहीही महत्त्व असू नये हेच काँग्रेसचे उद्दिष्ट राहले आहे. त्यामुळेच समाजातील वाढत्या विद्वेषाला प्रेमभावनेचे उत्तर देण्यासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने संविधान बचाव व सद्भावना रॅली, सभेचे आयोजन करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने येत्या २६ एप्रिल २०२५ रोजी खामगाव येथील संत तुकाराम महाराज सभागृह, नांदुरा रोड येथे सकाळी १० वाजता प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत भव्य सद्भावना संकल्प सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, माजी आमदार राहुल बोंद्रे तर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस प्रभारी कुणाल चौधरी, बुलढाणा जिल्हा निरीक्षक राजेंद्र राख, आमदार धीरज लिंगाडे यांचेसह काँग्रेस पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी सद्भावना सभेचे उद्दिष्ट, काँग्रेसचे आगामी काळातील ध्येय, धोरण व आगामी निवडणूक संदर्भात प्रदेशाध्यक्षांसह प्रमुख पदाधिकारी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

# पाकिस्तानकडून नियंत्रण रेषेवर गोळीबार, भारताकडून प्रत्युत्तर

## LOC वर भारतीय सेना आणि पाक आमने-सामने

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी



नवी दिल्ली : जम्मू - काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण भारतात संताप व्यक्त होत आहे. याचा बदला घेण्याची मागणी भारतीयांकडून होते आहे. या दहशतवादी हल्ल्याच्या विरोधादरम्यान LOC वर भारत आणि पाकिस्तानी सेनेदरम्यान तणाव सुरू झाला आहे. नियंत्रण रेषेवर (एलओसी) पाकिस्तानकडून गोळीबार झाल्याचे वृत्त आहे.

पाकिस्तानी सैन्याने काही ठिकाणी लहान शस्त्रांनी गोळीबार केला. भारतीय सैन्याने याला चोख प्रत्युत्तर दिलं. या घटनेत भारतीय बाजूने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. भारतीय लष्कराचे अधिकारी अधिक माहिती घेत आहेत.

दुसरीकडे जम्मू आणि काश्मीरमधील बांदीपोरा जिल्ह्यातही दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बांदीपोरा जिल्ह्यातील कुलनार बाजीपोरा भागात अतिरेकी असल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी तेथे घेराबंदी आणि शोध मोहीम सुरू केली. त्यावेळी लपून बसलेल्या अतिरेक्यांनी सुरक्षा कर्मचाऱ्यांवर गोळीबार केल्यानंतर शोध मोहीम चकमकीत रूपांतरित झाली.या तणावाच्या माहितीनंतर लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी लवकरच श्रीनगर आणि उधमपूरला रवाना होत आहेत. संरक्षण अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, लष्करप्रमुख काश्मीर खोऱ्यात तैनात असलेल्या वरिष्ठ लष्करी कमांडर आणि इतर सुरक्षा संस्थांच्या अधिकाऱ्यांची भेट घेतील. ते सध्याच्या सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेतील. तसंच, ते नियंत्रण रेषेवर पाकिस्तानी सैन्याकडून होत असलेल्या शस्त्रसंधी उल्लंघनाच्या प्रयत्नांचा आढावा घेतील.

# दहशतवाद्यांच्या डोक्यावर कॅमेरे, फोटो काढले,

## रखतना झालाय का पाहिलं; प्रत्यक्षदर्शींची आँखोदेखी





महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

श्रीनगर: जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मूत्यू झाला आहे. यामध्ये मध्य प्रदेशच्या इंदूरचे रहिवासी असलेल्या सुशील नथानियल यांचा समावेश आहे. गुरुवारी त्यांच्यावर जुन्या इंदूरमधील कब्रस्तानात ख्रिश्चन रितारिवाजांनुसार अंत्यविधी करण्यात आले. यावेळी त्यांच्या पत्नी जेनिफर, मुलगा ऑस्टिन, मुलगी आकांक्षा, कुटुंबीय, नातेवाईक आणि मित्र परिवार उपस्थित होता. मध्य प्रदेशचे मंत्री तुलसी सिलवट, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष जितू पटवारीदेखील हजर होते. नथानियल यांच्या अंत्ययात्रेत शेकडो नागरिक सहभागी झाले होते. त्यांनी साश्रू नयनांनी नथानियल यांना अखेरचा निरोप दिला.

सुशील नथानियल यांचा मुलगा ऑस्टिन (२१) यानं दहशतवाद्यांचा हल्ला अगदी जवळून पाहिला. त्यानं इंदूरमध्ये माध्यमांशी संवाद साधताना अंगावर काटा आणणारा घटनाक्रम सांगितला. ऑस्टिनच्या समोरच दहशतवाद्यांनी सुशील यांच्यावर गोळ्या झाडल्या. 'जिथे दहशतवादी हल्ला झाला, तिथे लष्कराचे जवान आणि पोलीस असायला हवे होते.

# शेतकऱ्यांचा शेतकऱ्यांकरिता शेतकरी एल्गार समितीच्या वतीने 'एल्गार मोर्चा'

## भाव वाढ करा, कर्जमाफी करा विविध मागण्या धडकला कारंजा तहसील कार्यालयावर एल्गार मोर्चा!

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी







कारंजा : शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'शेतकरी एल्गार समिती'च्या नेतृत्वाखाली कारंजा तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी, तसेच प्रति एकर १०,००० रुपये प्रमाणे भावांतर अनुदान मिळावे या प्रमुख मागण्यांसह एकूण नऊ मागण्यांसाठी गेल्या चार महिन्यांपासून समितीचे आंदोलन सुरू आहे.या कालावधीत समितीचे पदाधिकारी गावोगावी जाऊन शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करत आहेत. शेतकऱ्यांनीही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत प्रत्येक टप्प्यावर आंदोलनाला पाठिंबा दिला. २१ मार्च २०२५ रोजी घेण्यात आलेल्या धरणा आंदोलनातही शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाला होता.

२२ एप्रिल रोजीच्या या आक्रोश मोर्चात डॉक्टर, वकील, कृषी केंद्र चालक, दुकानदार, सरपंच संघटना, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी तसेच शेतकरी व शेतमजूरांनी एकत्र येत उष्णतेची तमा न बाळगता सहभाग नोंदवला. आंदोलनाच्या यशात अनेकांचे मोलाचे योगदान लाभले. मोर्चाच्या आयोजनासाठी मा.डॉ. पंकज काटोले यांनी आर्थिक साहाय्य केले. याशिवाय संकेतभाऊ नाखले, अरविंद पाटील इंगोले, श्रीधर पाटील कानकिरड, प्रादिप वानखडे, देवेंद्रभाऊ लांडकर यांचेही महत्त्वाचे योगदान लाभले. गावोगावी फिरण्यासाठी वाहनांची व्यवस्था करण्यात आली. डॉ. रमेश चंदनशिव यांची खासगी गाडी यासाठी वापरण्यात आली असून डिझेलसाठी सर्वाधिक खर्च त्यांनीच केला.

शेतकरी एकजूट दाखवत पुढे सरसावले.

राजकुमार दिघडे, कैलासभाऊ डोंगरे, ओमप्रकाशजी तापडिया, मनोजभाऊ कानकिरड दिलीप रोकडे ,सागर दुर्गे,संकेत नाखले,अरुण चव्हाण ,माया लाहे ,शेतकरी एल्गार समितीच्या पदाधिकाऱ्यांबरोबर गावोगावी जाऊन शेतकऱ्यांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. मोर्चात सहभागी झालेल्या प्रत्येक व्यक्तीचे समितीने आभार मानले. या आंदोलनात प्रकाशभाऊ पोहरे, ज्ञायकभाऊ पाटणी, माजी नगराध्यक्ष अरविंदजी लाठीया, अब्दुल राजिक शेख, प्रदिप वानखडे, विदर्भ राज्य आंदोलन समितीचे पश्चिम विभाग अध्यक्ष राजपूत सर, महिला प्रदेशाध्यक्षा रंजनाताई मामर्डे, शेतकरी नेते विष्णुपंत भुतेकर, दामूभाऊ अण्णा इंगोले, ज्योतीताई गणेशपुरे आणि विलासराव सुरडकर विजय देशमुख ओमप्रकाश तापडिया , भारत भगत यांसारखे विविध क्षेत्रातील मान्यवरही सहभागी झाले होते. शेतकरी एल्गार समितीचा निर्धार कायम "राजकीय पक्ष वेगळे असले तरी आपण सर्व प्रथम शेतकरी आहोत," असा संदेश या आंदोलनातून देण्यात आला. जोपर्यंत शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा ठाम निर्धार शेतकरी एल्गार समितीने व्यक्त केला आहे. सर्व सहकाऱ्यांचे आणि सहभागींचे मन:पूर्वक आभार मानून, भविष्यातही शेतकऱ्यांच्या हक्कासाठी एकजूट राखण्याचे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले... शेतकऱ्यांकरिता दैनिक देशोन्नती संपादक प्रकाश भाऊ पोहरे यांनी निवेदन देताना शेतकऱ्यांना आश्वासन दिले कोर्टामध्ये लढू लढाई याकरिता तुम्ही आम्हाला आमच्याकडे फॉर्म घेऊन भरून द्यावे असे सांगीतले . असे वृत्त प्रत्यक्षदर्शी पत्रकार विनोद गणवीर यांनी कळवीले.

# ना.आकाश दादा फुंडकर यांच्या हस्ते लायन्स ज्ञानपीठचे मुंबई उपविजेते रुद्र जोशी व मानव माडीवाले यांचा सत्कार

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी



खामगाव : भारत विकास परिषद खामगाव शाखेचा नूतन कार्यकारणी शपथ ग्रहण समारंभ सोहळा स्था.प्रेम लॉन्स येथे दि.२० एप्रिल रविवार रोजी थाटामाटात पार पडला, नवीन अध्यक्ष म्हणून सुनीलजी अग्रवाल यांची नियुक्ती करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार आकाश दादा फुंडकर,संतोषजी देशमुख, नवीनजी कृपलानी, प्रा.विजयजी पुंडे, कन्हैयालालजी पारीक हे होते. यानिमित्त भारत विकास परिषद तर्फे घेण्यात आलेल्या भारत को जानो या सामान्य ज्ञान वर आधारित स्पर्धेत लॉयन्स ज्ञानपीठ खामगाव येथून रुद्र रवि जोशी व मानव अमर माडीवाले या चमूची बुलढाणा जिल्ह्यातून विदर्भ स्तराकरिता निवड झाली होती,नागपूर येथील विदर्भस्तरीय स्पर्धेत मोठ्या शाळेच्या विद्यार्थ्यांवर मात करीत खामगाव येथील या चमूने विजयश्री संपादन केला होता व त्यांची निवड थेट स्टेट लेव्हल मुंबई येथे होणाऱ्या स्पर्धेकरिता निवड करण्यात आली होती. व तेथे त्यांनी उपविजेते पद पटकविले,त्यांनी घेतलेल्या या विजयाच्या भरारीची दखल घेत भारत विकास परिषद द्वारे या नूतन कार्यकारणी शपथ ग्रहण समारंभात या दोन्ही विद्यार्थ्यांना सहपरिवार आमंत्रित केले व नामदार आकाश दादा फुंडकर कर यांच्या हस्ते या दोन्ही विद्यार्थ्यांचे सहपरिवार सत्कार केला.यावेळी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला या स्पर्धेकरिता त्यांना लॉयन्स शाळा व्यवस्थापन समितीचे अरुणजी गुप्ता,अशोकजी चांडक, प्रकाशजी केडिया, कन्हैयालालजी पारीक, गिरीशजी पवार,प्राचार्य अर्चना द्विवेदी,सह विजय निमकर्डे सर,सुचिता मुंजे, सीमा मुंशी, लॉयन्स ज्ञानपीठ चे व्यवस्थापन मंडळ,आदींचे मार्गदर्शन लाभले होते.

गाव तेथे वार्ताहर!
संपूर्ण राज्यात जिल्हा/ तालुका/ शहर व ग्रामस्तरावर
वार्ताहर/ जाहिरात प्रतिनिधी नेमणे आहे
दैनिक महाराष्ट्र जीत
संपर्क
मुख्य संपादक
सागर राणा अंभोरे
99210 45121
संपादक
बंडूभाऊ इंगोले
96044 30002

१ २ ३ ४ ५ ६

दैनिक
# महाराष्ट्र जीत
शुक्रवार दिनांक 25 एप्रिल 2025



## संपादकीय

### मातृत्वाची अनघड वाट!

साधारणतः दोन दशकांपूर्वी प्रजनन आरोग्यासंदर्भात पुरेशी जाणीव जागृती नसली तरीही कुटुंबनियोजन, प्रसूती, बाळंतपण, लैंगिक आरोग्य यासंदर्भातील शंकाकुशंकांची डॉक्टरांकडे दबकत विचारणा व्हायची. समज गैरसमज होते. आज मात्र परिस्थिती बदलली आहे. गर्भधारणेपासून प्रसूतीपर्यंतच्या टप्प्यांवर गुंतागुंत वाढल्यानंतर डॉक्टरांकडे धाव घेणाऱ्यांची संख्या वाढती आहे. आज प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीपश्चात आई अन् बाळाच्या आरोग्यासंदर्भात नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. ते वेगवेगळ्या सामाजिक आर्थिक स्तरांनुसार शहरांमध्ये बदलत आहेत. शहरी भागामध्ये मुलांमध्ये कुपोषण आणि अतिपोषण या दोन्ही स्तरांवर मुलांची संख्या प्रमाण वाढताना दिसते, तर लठ्ठपणा आणि वंध्यत्वामुळे नैसर्गिक गर्भधारणा होण्यात येणाऱ्या अडचणी वाढत्या आहेत. मूल व्हावे यासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्यायला येणाऱ्या अनेक जोडप्यांमध्ये लैंगिक संबधांचे प्रमाणच अत्यंत कमी असल्याचे दिसते. उशिरा होणारे विवाह, बदलती जीवनशैली, व्यसनाधीनता, लठ्ठपणा, संप्रेरकांमधील बदल, रजोनिवृत्तीचे अलीकडे आलेले वय अशी अनेक कारणे वंध्यत्वासाठी कारणीभूत असल्याचे दिसते. 'वाढत्या वयाच्या टप्प्यांमध्ये होणारी प्रसूती हा जितका आई आणि बाळाच्या आरोग्यासाठी गुंतागुंतीचा विषय होत आहे. तितकाच अवघड पेच हा मूल होऊ देण्याच्या निर्णयासंदर्भातला असल्याचे स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. अश्विनी भालेराव-गांधी सांगतात. तिशीमध्ये मूल नको, नंतर पाहू, असा निर्णय घेतलेली अनेक जोडपी पुढे तीन चार वर्षांनी मुलाचा विचार करतात. वाढत्या वयात गर्भारपणाची जोखीम अधिक वाढते. आईला मधुमेह, उच्च रक्तदाब इतर सहआजार असतील तर बाळाच्या आरोग्यावरही त्याचे दुष्परिणाम होताना दिसतात. नैसर्गिक प्रसूतीपेक्षा वेदनारहित सी सेक्शन प्रसूतीसाठी आग्रह वाढता आहे. प्रजनन आरोग्यासंदर्भात पुरेशी माहिती नसल्यामुळे मूल हवे की नको, या द्वंद्वात असलेल्यांची संख्या वाढत आहे. मुलगाच हवा, हा छुपा अट्टहास आजही अनेक कुटुंबात आहे. कुटुंबनियोजन ही केवळ अपत्यप्राप्तीनंतर मूल होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना नाही तर ज्यांना मूल हवे आहे, त्यांच्यासाठी या योजनांमध्ये विशेषत्वाने विचार होण्याची गरज आहे. वंध्यत्वनिवारणासाठी वैद्यकीय उपचारांची सुविधाही त्यात असणे अपेक्षित आहे. त्याचा विचार यात करण्यात आलेला नाही. गर्भपातासाठी वैद्यकीय सल्ल्याने देण्यात येणारी औषधे, गर्भधारण होऊ नये यासाठी घेण्यात येणाऱ्या गोळ्या, मासिक पाळी लांबवण्यासाठीची औषधे वेगवेगळी असतात, मात्र त्याबद्दल व्यवस्थित माहिती नसल्याने त्यांचा चुकीचा वापर होतो. गरोदर स्त्रियांचे वजन, हिमोग्लोबिन योग्य राहण्यासाठी तपासणी, अन्य आरोग्य सुविधांची उपलब्धता व प्रसूतीसाठी स्त्रीरोगतज्ज्ञाची सेवा या सुविधा आज शहरी भागामध्येही अनेक ठिकाणी उपलब्ध नाहीत. आईचे आरोग्य, तिचा आहार, प्रसूतीदरम्यान तिची काळजी, बाळाचे पोषण, प्रसूतीमधील गुंतागुंतीचे स्वरूप विविध सामाजिक, आर्थिक स्तरांमध्ये वेगवेगळे आहे. वंध्यत्वाचे वाढते प्रमाण, सरोगसी, कृत्रिम गर्भधारणेची मदत घेऊन अपत्यप्राप्ती, सरोगेट मातांचे बिकट होत जाणारे प्रश्न...असे त्याचे अनेक आयाम दिसतात. प्राथमिक स्तरावर माता आणि मुलांच्या आरोग्यासंदर्भात ज्या सेवा मिळायला हव्यात, त्या आजही मिळत नाही. त्यामुळे सर्व ताण मुख्यत्वे सार्वजनिक आरोग्यव्यवस्थेवर येतो. शहरातही मुलांमधील कुपोषण वाढते आहे. माता आणि बालआरोग्याच्या संदर्भातले निर्णय हे मागील अनेक वर्षांपासून प्रशासनाकडून घेतले जातात. त्यात डॉक्टरांचा समावेश अभावानेच असतो. सरकारच्या मर्जीने या योजना आखल्या जातात, राबवल्या जातात. पोषण आहारातंर्गत देण्यात येणारी पाकिटे निकृष्ट दर्जामुळे टाकून दिली जातात. शहरी, ग्रामीण आणि आदिवासी भागातील कामाचे स्वरूप, पोषणाच्या गरजाही वेगवेगळ्या आहेत. त्यात केवळ 'दिले कंत्राट सुटला तिढा,' असा विचार करून चालणार नाही. महिला आणि मुलांच्या आरोग्याचा प्रश्न हा आरोग्यव्यवस्थेतला सर्वात कळीचा मुद्दा असायला हवा. तो आहे का, याचा विचार नुकताच पुण्यात जुळ्या बाळांना जन्म देऊन जग सोडून गेलेल्या आईच्या निमित्ताने तरी व्हायला हवा!केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने आरोग्य विभागामार्फत देशाची भावी पिढी सुदृढ आणि निरोगी व्हावी या हेतूने अनेक योजना राबवल्या जातात. मात्र प्रशासकीय दिरंगाई, भ्रष्टाचार आणि संबंधित कर्मचाऱ्यांची उदासीनता यामुळे प्रत्यक्ष लाभापासून माता आणि नवजात बालके वंचित राहतात. एकात्मिक बालविकास सेवा योजनेतून सेवा पुरवणाऱ्या पर्यवेक्षकांना वाहनांची सोय नसते. शिवाय ग्रामीण भागात सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही अत्यंत अपुरी आणि अनियमित असते. आदिवासी विभागात जिथे या सेवा अधिक संवेदनशीलपणे राबविण्याची आवश्यकता असते, तेथील निम्म्याहून अधिक पदे रिक्त आहेत. त्यामुळे कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त पदभार आहे. त्यासाठी त्यांना कोणत्याही स्वरूपाचे अतिरिक्त भत्ते, मानधन दिले जात नाही. त्यामुळे त्यांना ही सेवा शिक्षा वाटते. परिणामी अनेक योजना केवळ कागदावरच राहतात. कष्टकरी ग्रामीण महिलांना गरोदरपणात आणि प्रसूतीनंतर शारीरिक श्रमाची कामे करायला लागू नयेत, तसेच पौष्टिक अन्न मिळावे म्हणून पंतप्रधान मातृवंदना, जननी सुरक्षा, मातृत्व अनुदान, बुडीत मजुरी (आदिवासी मातेसाठी) इत्यादी आर्थिक अनुदाने देण्याची घोषणा करण्यात आलेली आहे. परंतु क्लिष्ट प्रक्रिया आणि जाचक अटींमुळे ही अनुदाने बहुतेकदा खऱ्या गरजू मातांना मिळतच नाहीत किंवा मिळतात त्यांना गरज असलेल्या वेळेत न मिळता जन्मलेले बाळ वर्षाचे झाल्यावर मिळतात. नवीन धोरणानुसार बँक खाते आधारशी जोडलेले असेल तरच अनुदान जमा होते. ग्रामीण, आदिवासी भागातील शेकडो महिलांकडे अद्याप आधार कार्ड नाही. असलेच तरी लग्नानंतर अद्ययावत केलेले नसते, अनेकदा अंगठ्याद्वारे आधार पडताळणी होत नाही. या कारणांमुळे महिला योजनांपासून वंचित राहतात.

# चिखली रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण करा

## अन्यथा गावकऱ्यांसह ठिय्या आंदोलन करणार, सरपंच अढाव व उपसरपंच बर्डे यांचा इशारा

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी





वाशीम - मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत वाशीम - चिखली खुर्द ते आसोला फाटा ( शेलू बाजार रस्ता ) पर्यंतचे अर्धवट राहिलेले काम डांबरीकरण करून पूर्ण करण्याच्या दृष्टीने येत्या २९ एप्रील पर्यंत कामास प्रत्यक्ष सुरुवात न केल्यास येत्या ३० एप्रिल पासून गावकऱ्यांसह कार्यकारी अभियंता, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन करणार असल्याचे गट ग्राम पंचायत चिखली खुर्द च्या सरपंच सौ. संध्या गणेशराव आढाव व उपसरपंच बाळूभाऊ बर्डे, संतोष सुर्वे यांनी ग्रामविकास मंत्री, पालकमंत्री वाशीम, प्रधान सचिव ग्रामविकास विभाग, अधीक्षक व कार्यकारी अभियंता मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत दिलेल्या निवेदन पत्राद्वारे म्हटले आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत वाशीम - चिखली खुर्द ते आसोला फाटा( शेलुबाजार रस्ता ) हा अंदाजे 4.8 किमी रस्ता मंजूर करण्यात आला. सर्व तांत्रिक, प्रशासकीय बाबी पूर्ण करून अंदाजे दीड वर्षांपूर्वी रस्त्याच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात करण्यात आली. त्यानुसार काही दिवसातच स्क्रपिंग करून बिबिएम् चे दोन थर टाकण्यात आले. कच्चा रस्ता तयार झाला. परंतु सिलकोट व त्यावर कार्पेट / डांबर टाकण्याचेच काम शिल्लक आहे. सद्यस्थितीत या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले असून रस्ता खूप खराब झालेला आहे. अनेक वाहने खिळखिळी होऊन खराब होत आहेत. शिवाय शारीरिक इजा, मणक्याचे आजार उफाळत असून ज्येष्ठ नागरिकांना, शाळेतील विद्यार्थ्यांना खूप त्रास होत आहे. सबब आता या रस्त्याचे उर्वरित काम होणे अत्यंत आवश्यक बनले आहे.आम्ही ग्राम पंचायत व सामाजिक संघटना पदाधिकारी म्हणून वेळोवेळी संबंधित कंत्राटदार, अधिकारी यांच्याशी फोनवरून, प्रत्यक्ष भेटून संपर्क केला असता निधी नसल्यामुळे काम बंद असल्याचे सांगण्यात येते. मा. आमदार महोदय हे सुद्धा याबाबतीत संबंधित सर्वांशी दोन वेळा बोलले परंतु कामाला सुरुवात होत नाही आहे. जर हा उन्हाळा निघून गेला तर पुढे सहा ( ६ ) महिने काम करता येणार नाही. पर्यायाने दरम्यानच्या काळात हा रस्ता पूर्वीपेक्षाही खराब होईल. परिणामी नागरिकांना दळनवळनास फार त्रास होईल.

# मनसेच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती जाहीर

महाराष्ट्र जीत : प्रविण पट्टेबहादुर



वाशिम- महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशाने आज 23 4 2025 रोजी वाशिम शहर मालेगाव रिसोड येथील मनसे नेते जयप्रकाश बाविस्कर यांच्या मार्गदर्शनात राजू पाटील यांच्या नेतृत्वात पद नियुक्ती करण्यात आल्या वाशिम जिल्हा सचिव पदी गजानन वैरागडे वाशिम मंगरूळपीर जिल्हा उपाध्यक्षपदी नरेंद्र भोयर. वाशिम शहराध्यक्षपदी शिवा भाऊ इंगोले. वाशिम शहर उपाध्यक्षपदी गजानन इंगोले.वाशिम तालुका अध्यक्षपदी विठ्ठल राठोड. अनिल भगत तालुका वाशिम उपाध्यक्षपदी. मालेगाव तालुका अध्यक्षपदी ज्ञानेश्वर गवळी. मालेगाव शहराध्यक्षपदी सुभाष गाभणे. मालेगाव रिसोड जिल्हा उपाध्यक्षपदी आतिश डहाळे. रिसोड तालुका सचिव पदी प्रवीण हाडे. रिसोड तालुका अध्यक्षपदी योगेश वाळके. मालेगाव तालुका उपाध्यक्षपदी अमोल बाविस्कर. शिरपूर शहर अध्यक्षपदी सुनील देशमुख. तिवळी सर्कल अध्यक्षपदी उद्धव जाधव. वारला सर्कल अध्यक्षपदी मांगीलाल राठोड. वाशिम शहर उपाध्यक्षपदी विलास इंगोले. व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# ' ग्रेप एम्बसी' त दिव्यांग विद्यार्थ्यांची धमाल..

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी



देवळाली कॅम्प- नाशिक म्हटलं की सर्वांच्या तोंडात पाणी आणणारी चमचमीत मिसळ आठवते आणि मिसळसाठी प्रसिद्ध ठिकाण म्हणजे गंगापूर रोडवरील 'ग्रेप एम्बसी'. केवळ खाद्यसंस्कृतीच नव्हे, तर सामाजिक जाणीव असलेला व्यवसाय म्हणूनही 'ग्रेप एम्बसी'चा लौकिक वाढत आहे.

प्रतीक पिंगळे आणि संधान परिवार गेल्या दोन वर्षांपासून दिव्यांग विद्यार्थ्यांना खास मिसळ पार्टीचं आमंत्रण देत असतात. यंदाही त्यांनी आपल्या या स्तुत्य उपक्रमाची परंपरा जपली. 'ऑल इंडिया डिसेबल्ड रिहॅबिलिटेशन अ‍ॅन्ड एज्युकेशन इन्स्टिट्यूट'च्या नाशिक रोड येथील तिन्ही शाळांतील सुमारे 150 दिव्यांग विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांना 'ग्रेप एम्बसी'मध्ये आमंत्रित केलं. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेच्या सचिव सुहासिनी घोडके यांच्यासह सर्वांचे व्यवस्थापनाच्या वतीने हृदयपूर्वक स्वागत करण्यात आलं. विद्यार्थ्यांनी मिसळचा मनमुराद आस्वाद घेतला आणि त्यांच्या गायनाने संपूर्ण परिसर न्हावून निघाला.

कार्यक्रमासाठी खास आमंत्रित पाहुणे माजी नगरसेविका कोमल मेहेरोलिया, सामाजिक कार्यकर्त्या आरती अहिरे आणि 'कर्तव्य दक्ष पोलीस मित्र' संघटनेचे अध्यक्ष प्रतापसिंग परदेशी उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, त्यांच्यात रममाण होऊन क्षणांना विशेष अर्थ दिला. परदेशी यांनी आपल्या कर्तव्य दक्ष पोलीस मित्र फाऊंडेशन मध्ये डॉ सौ घोडके आणि श्री आनंद त्रिभुवन यांना महत्वाची पदे देत प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. दिव्यांग मुलांचे मुखावर ओसंडणारा आनंद पाहून प्रतिक पिंगळे व ज्योती संधान यांनी पुढील वर्षी ही भेट देण्याचे आमंत्रण दिले. या उपक्रमाचे सर्व स्तरांवरून कौतुक होत असून प्रतीक पिंगळे व संधान परिवाराने दाखवलेली सामाजिक बांधिलकी प्रेरणादायी ठरत आहे. सूत्रसंचालन कमळ उबाळे आणि प्रिती घोडके केले. सुहासिनी घोडके यांनी शुभेच्छा देत आभार मानले. राष्ट्रगीताने सांगता कार्यक्रमाची सांगता झाली.

# जय हिंद सैनिक संस्थेच्या वतीने धरती मातेच्या सुपुत्रांना अभिवादन



महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

देवळाली कॅम्प,- जिल्हा शासकीय रुग्णालय नाशिक येथे जय हिंद सैनिक संस्थान तर्फे आज दिनांक 23 एप्रिल 2025 रोजी भगतसिंग राजगुरू आणि सुखदेव यांच्या स्मृतीला अभिवादन करून सद्भावना कार्यक्रम संपन्न करण्यात आला त्यावेळी , संघटनेचे अध्यक्ष गुलबीर भाऊ चितोले , उपाध्यक्ष संजय सिंलेलान महासचिव प्रवीण साळी महिला अध्यक्ष टिनू वाघिले सर्व पदाधिकारी आणि बहुसंख्येने कर्मचारी उपस्थित होते तसेच काश्मीर पहलगाम येथे झालेल्या भ्याड हल्ल्याबद्दल निषेध वेक्त करण्यात आला व मृत्यूमुखी पडलेले भारतीय नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आली

# मिरा भाईंदर महानगरपालिका पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी कटिबद्ध – पहलगाम येथील हल्ल्यानंतर तातडीने कारवाई सुरु

महाराष्ट्र जीत :सुनील झळके




भिवंडी- जम्मू काश्मीर येथील पहलगाम परिसरात नुकत्याच घडलेल्या हल्ल्यात अनेक पर्यटक अडकले असून, त्यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील काही पर्यटकांचा समावेश असल्याची शक्यता आहे. या घटनाक्रमाची गंभीर दखल घेत मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वाखाली पर्यटकांची माहिती मिळवण्यासाठी तातडीने प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत.

महापालिका प्रशासनामार्फत संबंधित यंत्रणांशी संपर्क साधत, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष, ठाणे जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर परिषद प्रशासन संचालनालय, जिल्हा ठाणे यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका या कठीण प्रसंगी आपल्या नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. संभाव्य पर्यटकांची नावे, संपर्क क्रमांक, व प्रवासाचा तपशील गोळा करण्यात येणार असून, त्यांच्याशी आणि त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क प्रस्थापित करून ते सर्वजण सुखरूप घरी परत यावेत यासाठी प्रशासनामार्फत आवश्यक ते प्रयत्न करण्यात येत आहेत.

# श्रीगुरुदेव सेवाश्रम शांतीनगर कारंजा येथे ग्राम जयंती उत्सव व विशाल सामुदाईक प्रार्थनेचे दि 27 एप्रीलला आयोजन

महाराष्ट्र जीत :नकूल उपाध्ये



कारंजा लाड: राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या इच्छेनुसार गावागावात ग्रामजयंती साजरी व्हावी करीता श्रीगुरुदेव सेवामंडळ; महीला भजनी मंडळ कारंजा द्वारा शांती नगर; आकाश दिप कॉलनी व लक्ष्मी नगर यांचे संयुक्त विद्यमाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ११६ व्या जयंती शुभ पर्वावर ग्रामजयंती उत्सव व विशाल सामुदाईक प्रार्थनेचे आयोजन दि२७ एप्रील रविवारी शांती नगर येथे करण्यात आले आहे . या कार्यक्रमासाठी श्रीगुरुदेव प्रेमींनी उपस्थीती द्यावी असे आवाहन निमंत्रक सुनील भाऊ दशमुखे; विजय खंडार यांनी केले आहे . सविस्तर वृत्त असे की श्रीगुरुदेव विचारांच्या महीला पुरुषांनी महीन्यातील एका रविवारी दोन तीन तासासाठी एकत्र यावे व त्या दिवशी सतसंग करावा . त्यात सामुदायीक प्रार्थना; राष्ट्रवंदना; ग्रामगीता मंथन; भजन पूजन ध्यान इत्यादीचा समावेश असावा . यावर्षी राष्ट्रसंताची ११६ वी जयंती असल्याने श्रीगुरुदेव भक्तांच्या सहयोगातून दि२७ एप्रील रोजी शांतीनगर कारंजा येथे ग्रामजयंती उत्सव साजरा होत आहे . अमृतवेळ सकाळी ४.३० वाजता पासून रात्री ११ वाजे पर्यन्त भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन केलेआहे . ग्रामगीता महोत्सवाचे व प्रबोधनाचे उदघाटन दुपारी४.३० वाजता भाष्करराव भावनगरे यांचे हस्ते; अशोकराव उपाध्ये राज्यशासन पुरस्कार प्राप्त माजी मुख्याधापक यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत असून प्रा अनुप नांदगावकर; संजयराव बोके यांची प्रमुख उपस्थीती असनार आहे . आजच्या युगाची संजीवणी बुटी राष्ट्रसंताची ग्रामगीता याविषयावर प्रचारक रवि वार्डेकर; तसेच ग्रामाची करावी आदर्श व्यवस्था याविषयावर ग्रामनाथाचार्य गोपाल काकड यांचे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन होईल त्यानंतर विशाल सामुदायीक प्रार्थनेचे आयोजन केले आहे . रात्री ११ वाजे पर्यन्त भजनी मंडळाद्वाराश्रीगुरुदेव भजनांचा कार्यक्रम होणार आहे . या श्रीगुरुदेवाचे ग्रामजयंती उत्सवास गुरुदेव प्रेमींनी उपस्थीती द्यावी असे आवाहन निमंत्रक सुनीलभाऊ दशमुखे; विजयभाऊ खंडार; बाळू पाटील दुर्गे; संतोष केळकर; रामबकस डेंडूळे; सौ .सिमाताई सातपुते; संतोष पाटील लळे; सौ छाया गावंडे; सौ छाया तुरुक; पंजाबराव बाकल; सौ . प्रमीला देशमुख इत्यादींनी केले आहे .

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी मुद्रक आर्यन प्रिंटर्स गांधी चौक कारंजा लाड येथे मुद्रीत करून दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय, कारंजा लाड, जि. वाशिम येथे प्रकाशित केले. भ्रमणध्वनी - ९९२१०४५१२१, ९६०४४३०००२ ( सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत ) ( या आवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहील. )

१ २ ३ ४ ५ ६

## हैद्राबाद अतियात चौकशी अधिनियम सुधारणेसाठी जनतेच्या सूचना आमंत्रित - जिल्हाधिकारी

महाराष्ट्र जीत : दिलीप मादाळे

हैद्राबाद अतियात चौकशी अधिनियम 1952 खाली ज्या जमिनी मुख्यत: अतियात अनुदानधारक यांच्या उदरनिर्वाहासाठी व धार्मिक संस्थेच्या देखभालीकरीता दिल्या आहेत त्या जमिनीबद्दल मराठवाड्यातील खालसा झालेल्या वर्ग 2 देवस्थान इनाम जमीनी वर्ग 1 करण्यासंदर्भात निर्णयाचा पुर्नविचारात करण्याबाबत जनतेकडून सुधारणा व सूचना लेखी स्वरुपात 15 दिवसात देण्याबाबत जिल्हा प्रशासनाने आवाहन केले आहे.

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्रं. लवेसू 2024/प्र.क्रं. 64/ज-7 अ दिनांक 3 एप्रिल 2025 अन्वये अतियात चौकशी अधिनियम, 1952 खाली ज्या जमिनी मुख्यत: अतियात अनुदान धारक यांच्या उदरनिर्वाहासाठी व धार्मिक संस्थेच्या देखभालीकरीता दिल्या आहेत. त्या जमिनीबद्दल मराठवाडयातील खालसा झालेल्या वर्ग 2 देवस्थान इनाम जमीनी वर्ग 1 करण्यासंदर्भात निर्णयाचा पुर्नविचारात करण्याबाबत जनतेकडून सुधारणा व सूचना मागवून घेणेकरीता नांदेड जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर पत्राच्या अनुषंगाने प्रसिद्धी देण्यात येत आहे की, मराठवाड्यातील पूर्वीच्या शासकांनी एखाद्या देवस्थानाचा दैनंदिन खर्च (उदा. दिवाबत्ती व देखभाल) करण्यासाठी देवस्थानाला प्रदान केलेल्या इनाम जमिनींना अतियात जमीन (खिदमतमाश इनाम जमीन) असे संबोधले जाते. मराठवाड्यातील खिदमतमाश इनाम जमिनीस हैदराबाद अतियात चौकशी अधिनियम, 1952 मधील तरतूदी लागू होतात. तत्कालीन शासकांनी वेळोवेळी देवस्थानाला प्रदान केलेल्या "खिदमतमाश इनाम जमिनीवर प्रामुख्याने शेती केली जाते. शेतीमधून मिळणाऱ्या उत्पन्नावर देवस्थानच्या दिवाबत्ती, देखभाल इ. चा खर्च भागविला जातो. सदर खर्च भागविण्यास अडचण निर्माण होऊ नये, या उद्देशाने उक्त कायद्यामध्ये "खिदमतमाश इनाम" जमिनीचे हस्तांतरण करण्यास प्रतिबंध करण्यात आले आहे.

सदरहू अधिनियमांतर्गत देवस्थान यांचेकडे असलेल्या बहुतांश जमीनी आता वाढत्या शहरीकरणामुळे शहरी भागात समाविष्ट झालेल्या आहेत. त्यामुळे तेथे शेतीपासूनचे कोणतेही उत्पन्न होत नाही. तसेच या जागेचा वापर धार्मिक संस्थाच्या देखभाल व दुरुस्तीसाठीही होत नाही. मूळात या जमिनीचे दायीत्व हे धार्मीक संस्थाच्या देखभालीकरीता तसेच अतियात अनुदान धारक यांच्या उपजिविकेकरीता असल्याचे दिसून येते. तथापि, आजरोजी या जमिनीचे काही प्रकरणात अनाधिकृत हस्तांतरण झाले असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे या जमनीचा मूळ उद्देश सफल होत नाही. तसेच त्यातून अतियात अनुदानधारक, धार्मिक संस्था, राज्य शासन यांना कोणताही महसूल मिळत नाही. तसेच यापैकी काही जमिनीवर विकास आराखडा, प्रारुप योजनेअंतर्गत विविध स्वरूपाची आरक्षणे टाकण्यात आलेली आहेत. सदरहू जमिनी वरील प्रतिबंधामुळे त्यावरील आरक्षणाशी सुसंगत प्रयोजनाकरिता विकसित करणे देखील शक्य होत नाही. त्यामुळे अशा जमिनीवर अतिक्रमणे बेकायदेशीर बांधकामे होण्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता होती.

या जमिनींच्या संरक्षणाचा प्रश्न भविष्यात निर्माण होऊ शकतो. यास्तव सदर जमिनीची उपयोगिता वाढविण्यासाठी तसेच अशा जमिनीचा कालानुरूप वापर करणे शक्य व्हावे यासाठी कायद्यात सुधारणा करण्याची गरज निर्माण झाली होती. याकरिता शासनाकडून नियुक्त करण्यात आलेल्या समितीने उक्त कायदयाच्या कलम 6 मध्ये सुधारणा करण्याच्या शिफारसी प्राप्त झाली आहे. त्याअनुषंगाने अतियात अनुदानधारक, संस्था तसेच सामान्य नागरिक यांनी याबाबत आपली मते लेखी स्वरूपात जिल्हाधिकारी कार्यालयात 15 दिवसात सादर करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

## आतंकवाद्याना भर चौकात फाशी द्या-सौ.प्राजक्ता महितकर; दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ कारंजात तीव्र निदर्शने पाकिस्तान मुर्दाबादच्या दिल्या घोषणा

महाराष्ट्र जीत : नकुल उपाध्ये

कारंजा लाड: जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ भाजपा कारंजा शहर आणि सकल हिंदू समाजाच्या वतीने २३ एप्रिल रोजी स्थानिक जयस्तंभ चौकात तीव्र निदर्शने करण्यात आली . यावेळी भारत माता की जय तथा पाकिस्तान मुर्दाबाद अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना दोन मिनिटे मौन धारण करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.






भाजपा जिल्हा अध्यक्ष राजु पाटील राजे यांच्या सुचनेनुसार आणि भाजपच्या कारंजा शहर अध्यक्ष सौ.प्राजक्ता माहितकर यांच्या नेतृत्वात दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध करून भारताने या हल्ल्याला चोख प्रत्युत्तर द्यावे आणि आतंकवादयांना भर चौकात फाशी द्यावी अशी मागणी शहर अध्यक्ष सौ. प्राजक्ता माहितकर यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचलन तथा प्रास्ताविक संदिप काळे यांनी केले. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष राजीव काळे,तेजपाल भाटिया, सस्तीकर, शुभांगी कौंडण्य, अनिता कोळसे, प्रीती धाकतोड, शुभांगी रावळे ,रजनी दहातोंडे, सोनाली विरूळकर, अर्चना देसाई , भाजप कामरगाव मंडळ अध्यक्ष संजय लाहे, संदीप कुऱ्हे ,विनीत गोलेछा, जिग्नेश लोढाया, किरीट रायचुरा, अतुल धाकतोड,गोपाल पुणेवार,प्रभाकर घोडसाड , समीर देशपांडे, निलेश कडू, अमित संगेवार, मोहन पंजवाणी, जावेद कामनवाले, लक्ष्मण कालीवाले, प्रदीप लाहे, निखिल घुडे, विनय गुल्हाने, अरुण घोडसाळ, मयूर लळे, सविज जगताप, राम देशमुख, सुनील गुल्हाने , पंकज राय, रवी शहाकार, शंतनू बोरकर, किशोर सोळंके, अनंता राईतकर, गजानन खोडे, दीपक फड, श्रेयस लाहे, , ब्रिज वानखडे यांच्यासह इतर कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

## राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या महिला विभागीय अध्यक्षपदी अश्विनीताई महेश राठोड यांची सर्वानुमते निवड

महाराष्ट्र जीत : भारत चव्हाण

सारकिन्ही- सारकिन्ही, राष्ट्रीय बंजारा परिषदेचे सर्वेसर्वा भगवंत सेवक, धर्मनेता आदरणीय किसन भाऊ राठोड यांच्या मार्गदर्शनानुसार, धर्मगुरु महंत जितेंद्र महाराज यांच्या शुभ आशीर्वादाने, व राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय प्रा. श्री. विलास भाऊ राठोड यांच्या मार्गदर्शनानुसार, व तसेच महिला प्रदेश अध्यक्ष सौ. सीमाताई प्रकाश राठोड, प्रदेश उपाध्यक्ष सौ. निर्मला ताई आडे यांच्या प्रमुख उपस्थितीत सौ.



आश्विनीताई महेश राठोड यांना नियुक्ती पत्र देऊन, अमरावती विभागीय अध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली .

भारतातील गोर बंजारा समाजातील अग्रगण्य मानली जाणारी राष्ट्रीय बंजारा परिषद ही प्रसिद्ध उद्योगपती धर्मनेता किसन भाऊ राठोड यांच्या कल्पक बुद्धी आणि दूरदृष्टीतून उदयास आलेली संघटना आहे,

ही संघटना गोर बंजारा धर्मसत्ता राजसत्ता शैक्षणिक, आणि प्रशासकीय सत्ता मिळवण्याच्या हेतूने कार्य करत आहे. संघटनेचे महाराष्ट्रातील राज्यात सर्व दूर जाळे पसरलेले असून समाजाच्या न्याय हक्क अधिकार व सन्मानासाठी सदैव तत्पर असते. अशा या संघटनेच्या महिला विभागीय अध्यक्ष पदाची जबाबदारी, अश्विनीताई महेश राठोड यांनी स्वीकारली.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 134 व्या जयंती पर्वाचे औचित्य साधून अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान (रजि.) चा विनामूल्य लकी ड्रॉ कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न..!

महाराष्ट्र जीत : गुरुनाथ तिरपणकर

मुंबई, शिवडी - अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान (रजि.) च्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंती पर्वाचे औचित्य साधून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री.अमोल वंजारे यांच्या अध्यक्षतेखाली विनामूल्य लकी ड्रॉ कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे नियोजन,सूत्रसंचालन मुंबई अध्यक्ष श्री. संदीप मोहिते यांनी केले, पाहुण्यांच्या शुभहस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. सदर कार्यक्रमास मा महापौर सौ. श्रद्धा ताई जाधव, मा.नगरसेवक व सोलापूर विभागाचे संपर्कप्रमुख श्री.अनिल कोकिळ, युवासेना महाराष्ट्र संघटक पवन जाधव,




प्रवासी ॲपचे संस्थापक श्री.विजय रेड्डी, बौद्धजन पंचायत समितीचे सरचिटणीस राजेश घाडगे, अक्षरा सामाजिक प्रतिष्ठानचे विश्वस्त श्री.सुजीत माटे, शिवडी विभाग १३ चे गटप्रमुख राजभाऊ तथा रामदास धो. गमरे, उद्योजक श्री. रुपेश तरल आदी मान्यवरांनी उपस्थिती दर्शवून बाबासाहेबांच्या जीवनपटाचा आढावा घेत आपले मौलिक असे विचार व्यक्त केले. तसेच जयंतीप्रीत्यर्थ सामाजिक उपक्रम राबवित लकी ड्रॉ चे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे कौतुक ही केले. सदर लकी ड्रॉ स्पर्धेत १३४ वी जयंती असल्याकारणाने १३४ स्पर्धकांना अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान (रजि.) च्या वतीने आकर्षक अशी एकूण १३४ बक्षिसे बक्षिसे देण्यात आली आणि सहभागी नागरिकांना ५ लाखाचा मोफत अपघात विमा प्रवासी ॲप विजय रेड्डी यांच्या वतीने अक्षरा सामाजिक प्रतिष्ठानच्या सहकार्याने देण्यात आला. त्याचप्रमाणे सामाजिक कार्यात अतुलनीय योगदान दिल्याबद्दल संजीव जाधव व सावंत मॅडम यांना सन्मानपत्र, पुष्पगुच्छ व शाल देऊन सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे व विशेषत: आरंभ बँक्वेट हॉल, आभार मानून अध्यक्ष अमोल वंजारे यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

## बंजारा परिषदेच्या महिला विदर्भ संघटक पदी सुनीता जाधव यांची निवड.

महाराष्ट्र जीत : सुभाष खडसे

(प्रतिनिधी भारत चव्हाण सारकिन्ही)सारकिन्ही,दीनांक २१ एप्रिल राष्ट्रीय बंजारा महिला परिषदेच्या विदर्भ महीला संघटक या पदावर महीला चळवळीच्या सक्षम नेत्या सुनीता किशोर जाधव अकोला यांची नियुक्ती करण्यात आली आहे

राष्ट्रीय बंजारा परिषद ही संघटणा धर्मनेता किसन राठोडराष्ट्रीय बंजारा परिषदेचे धर्म नेता किसन भाऊ राठोड, धर्मगुरू जितेंद्र जी महाराज, राष्ट्रीय बंजारा परिषदेचे अध्यक्ष विलास भाऊ राठोड, महिला प्रदेशाध्यक्ष सीमाताई राठोड आणि उपाध्यक्ष निर्मलाताई आडे यांच्या मार्गदर्शनात राज्यात. काम करीत असून वाशीम जिल्ह्याचे काम महिला



आघाडीच्या मुलुखमैदाणी तोफ सीमा प्रकाश राठोड या काम पाहत असुन महिला सक्षमीकरनात सतत प्रकाशझोतात असणार्या सुनीता किशोर जाधव यांची याच. बंजारा परिषदेच्या महिला आघाडीच्या विदर्भ संघटक पदावर नियुक्ती करण्यात आली असून बंजारा परिषदेच्या ध्येयधोरनानुसार आपण कार्य. करणार असून महिलांनच्या हक्कासाठी सदैव लढणार असून बंजारामहीला राष्ट्रीय परीषदेने दिलेली जबाबदारी आपण पुर्ण ताकतीने फार पाडणार असल्याची माहिती नवनिर्वाचित विदर्भ महीला संघटक सुनीता किशोर जाधव यांनी दिली असुन सुनीता जाधव यांचे कार्य वाशीम व अकोला जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात व्यापलेले असून अकोला येथे राहणार्या सुनीता जाधव यांची बंजारा परिषदेच्या नीदर्भ संघटक पदावर नियुक्ती करण्यात आल्याने त्यांचे सर्व अभिनंदन होत आहे व आपल्यावर सोपविलेली जबाबदारी आपण सक्षमपणे फार पाडू अशी प्रतिक्रिया सुनीता जाधव यांनी दिली आहे

## शिवशंभो यात्रेनिमित्त भातागळी फेस्टिवल 2025 व खुली नृत्य स्पर्धा थाटात संपन्न

महाराष्ट्र जीत : अविनाश जाधव

कळंबोली: - शिवशंभूची यात्रा ही भातागळी तालुका लोहारा जिल्हा उस्मानाबाद येथे संपन्न झाली. शिवशंभु ची यात्रा पातळी परिसरातील पंचक्रोशी मध्ये सर्वात मोठी यात्रा मानली जाते ही यात्रा चैत्र पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी असते.

यात्रा झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी कुस्ती असते व त्यानंतर गावकऱ्यांतर्फे व परिसरातील भाविकांतर्फे भाताई फेस्टिवलचे आयोजन केले जाते. यावर्षीही भाताचे फेस्टिवल दिनांक १६/०४/२०२५ रोजी आयोजित केला होता. राज्यातील विविध जिल्ह्यातील कलाकारांनी फेस्टिवलमध्ये सहभाग घेतला होता. भातागळी फेस्टिवल मध्ये राज्यातील अलिबाग, मुंबई ,सातारा ,सांगली, कोल्हापूर ,जळगाव ,लातूर ,नांदेड, बीड, इत्यादी शहरातील जवळपास ८२ वैयक्तिक व सांघिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला.

बाल ,प्रौढ ,लावणी या प्रकारामध्ये वैयक्तिक व सामूहिक बक्षिसा अंतर्गत एकूण एक लाख 40 हजार रुपयाची पारितोषिके विजेत्या स्पर्धकांना देण्यात आली.

भातागळी फेस्टिवल 2025 ही स्पर्धा दोन दिवस संपन्न झाली.

पहिल्या दिवशीचे उद्घाटन लोहारा- उमरग्याचे तालुक्याचे लोकप्रिय आमदार श्री प्रवीण स्वामी सर , युवा नेते शिवसेना श्रीअजिंक्य बापू पाटील, शिवसेना तालुका अध्यक्ष अमोल बिराजदार , जि प चे माजी सदस्य आनंद पाटील, गावचे सरपंच सुषमा माने, उपसरपंच हनुमंत जगताप, व्हाईस चेअरमन सत्यवान पाटील व इतर मान्यवरांच्या हस्ते झाले.

दुसऱ्या दिवशीचे उद्घाटन सक्षणा सलगर, राष्ट्रीय अध्यक्ष युती काँग्रेस शरद पवार गट ,सन्माननीय रवींद्र माने सर जिल्हा कृषी अधीक्षक धाराशिव , ॲडव्होकेट श्री. शाम जावळे (पाटील) जिल्हा सत्र न्यायालय धाराशिव,श्री महेश देवकते तालुका कृषी अधिकारी लोहारा, लोहार्याच्या प्रथम नगराध्यक्ष पौर्णिमा ताई लांडगे, तसेच शिवसेना महिला आघाडीच्या तालुका अध्यक्ष सुवर्णमाला नारायणकर, लोहाराच्या माजी सरपंच निर्मलाताई स्वामी ,सामाजिक कार्यकर्त्या आरती मुकुंद जगताप ,सामाजिक कार्यकर्त्या दैवशाला सत्यवान पाटील ,गावचे सरपंच, उपसरपंच, व्हॉइस चेअरमन व इतर मान्यवरांच्या हस्ते झाले.

या स्पर्धेला भातागळी सह पंचक्रोशीतील नागरिकांनी प्रचंड असा प्रतिसाद दिला. ही राज्यस्तरीय खुली नृत्य स्पर्धा अतिशय यशस्वी झाली याचा मनापासून आनंद वाटला.

भातागळी गावातील शासन सेवेत लागलेल्या तरुणांचा, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचा व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सामाजिक व्यक्तींचा फेस्टिवल संयोजन समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी माझ्यासह, गावचे सरपंच, उपसरपंच, व्हाईस चेअरमन ,आनंद पाटील मित्र परिवार, गणेश फत्तेपुरे, अविनाश जगताप, बालाजी माने, संतोष जगताप, माऊली जगताप, शिवाजी मिसाळ, वैभव जगताप व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले

## जांभवडे गावी रविवारी धार्मिक उपक्रम

### शिवलीलाताई पाटील यांचे कीर्तन आणि महाप्रसाद

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

मुंबई-धर्म, संस्कृती, संस्कार यांची जपवणूक करणाऱ्या मुंबईच्या कृष्णतारा प्रतिष्ठान तर्फे यंदाही सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जांभवडे गावी रविवार दि. २७ एप्रिल रोजी प्रसिद्ध कीर्तनकार शिवलीलाताई पाटील (बार्शी) यांच्या कीर्तनाचा तसेच धार्मिक उपक्रमांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

स्व. कृष्णा महादेव सातार्डेकर आणि स्व. तारामती कृष्णा सातार्डेकर यांच्या स्मरणार्थ कीर्तन, सत्यनारायणाची महापूजा धार्मिक उपक्रम आणि महाप्रसादाचे आयोजन जांभवडे येथील गवाणमळा येथे होणार असल्याचे कृष्णतारा प्रतिष्ठानचे प्रमुख अध्यक्ष विलास कृ सातार्डेकर यांनी सांगितले. प्रतिष्ठानतर्फे विविध सामाजिक, धार्मिक, सेवाभावी उपक्रम मुंबईत आणि कोकणात आयोजित करण्यात



येतात रविवार दि. २७ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता कीर्तन व रात्रौ महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. श्री व सौ. विलास सातार्डेकर यांच्यासह शिवांश, सुमित, अक्षय सातार्डेकर आणि प्रथमेश पावसकर, सुरेश म्हाडदळकर, मंदार गोवेकर, प्रदिप पेडणेकर यांनी या सोहळ्याचे आयोजन केले आहे. ग्रामस्थ मंडळानी यात सहभागी व्हावे, असे आवाहन सातार्डेकर कुटुंबियांनी केले आहे.


१ २ ३ ४ ५ ६

महत्त्वाचे

## कृषिरत्न डॉ.जगन भालेराव यांची महाराष्ट्र भूषण पुरस्कारासाठी निवड; पुरस्कार नाशिक येथे होणार प्रदान

वाशिम- येथून जवळच असलेल्या ग्राम तांदळी शेवई येथील आदर्श व्यक्तिमत्व तथा कृषिरत्न, डॉ. जगन भालेराव यांची प्रतिष्ठीत समजला जाणारा महाराष्ट्र भूषण या



पुरस्कारासाठी निवड झाली आहे.हा पुरस्कार महाराष्ट्राचे माननीय कृषी मंत्री माणिकराव कोकाटे साहेब यांच्या हस्ते नाशिक येथे डॉ. जगन भालेराव साहेब यांना प्रदान होणार आहे. त्याबद्दल त्यांचे सर्व तांदळी शेवई गावाकऱ्याच्या वतीने हार्दिक अभिनंदन कृषी संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल आतापर्यंत त्यांना अंतराराष्ट्रीय, राष्ट्रीय आणी राज्यस्तरीय पातळीवरील बरेच पुरस्कार मिळाले आहे,केंद्र सरकारच्या विविध कृषी संशोधन संस्थे मध्ये ते संशोधक सल्लागार सदस्य म्हणून कार्यरत आहेत. आताच त्याच्या कांदा या पिकावर अमेरिका या देशात संशोधन पेपर प्रकाशित झाला आहे.आंतरराष्ट्रीय पातळीवरील वरिष्ठ कृषी शास्त्रज्ञ तथा कृषी जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख म्हणून ते आता वर्धा येथे कार्यरत आहेत. पुनःच्छ त्यांना एकदा मनापासून हार्दीक अभिनंदन तथा पुढील वाटचालीस हार्दीक शुभेच्छा तांदळी शेवई तथा वाशीम जिल्ह्याचे नाव जगभर पोचवल्या बद्दल त्यांचे जिल्हाभरात सर्वत्र अभिनंदन होत आहे.याही अगोदर डॉ जगन भालेराव यांना विविध पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

## पहलगाम हल्ल्याचा आझाद समाज पार्टी (कां) वाशिमच्या वतीने जाहीर निषेध. शासकीय गुप्तचर यंत्रणा सक्षम करण्याची मागणी

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

वाशिम - दि. २४ : जम्मू कश्मीर मधील पहिला या पर्यटन स्थळे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याचा आजा समाज पार्टी (कां), वाशिमच्या वतीने तीव्र निषेध नोंदविण्यात आला. यावेळी शासकीय गुप्तचर यंत्रणा सक्षम करण्याची मागणी करण्यात आली.दिनांक 22 एप्रिल रोजी झालेल्या या हल्ल्यात 27 जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. हे नुकसान कधीही भरून न निघणारे आहे. तरीही त्यांच्या कुटुंबीयांना शासनाने योग्य ती कारवाई करून मदतीचा हात पुढे करून देशातील प्रत्येक भारतीय त्यांच्यासोबत आहे असा विश्वास व्यक्त करावा. भविष्यात या किंवा यासारख्या कुठल्याही घटना घडणार नाही याची केंद्र शासनाने योग्य ती खबरदारी घ्यावी व शासकीय गुप्तचर यंत्रणा सक्षम करावी. अशा मागणीचे निवेदन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकारी वाशिम यांचे मार्फत पाठविले आहे.यावेळी जिल्हाध्यक्ष सुभाष अंभोरे, जिल्हा उपाध्यक्ष संजय प्रधान, जिल्हा प्रवक्ता गोवर्धन राऊत, शहराध्यक्ष विजय पट्टेबहादूर, जिल्हा सचिव केशव उचित, तालुका अध्यक्ष किशोर खडसे, तालुका प्रवक्ता भगवान पट्टेबहादूर,जिल्हा सल्लागार सुरेश सोनवणे श्रीरंग चवरे प्रवीण खिल्लारे अर्जुन राऊत आणि पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.



## आयुष गिरी या विद्यार्थ्याचा आंतरराष्ट्रीय स्तरावर विश्वविक्रम....

महाराष्ट्र जीत :अजय भगत

मंगरूळपीर: आर. जे. हायस्कूल व कॉन्व्हेंट चा वर्ग सहावीचा विद्यार्थी चि. आयुष विनोद गिरी यांनी पेरियॉडिक टेबल मधील 125 एलिमेंट्स चे क्रमावर पठण अवघ्या 40 सेकंद मध्ये करून आंतरराष्ट्रीय स्तरावर विश्वविक्रम केला. हा विश्वविक्रम इतर विश्वविक्रम पेक्षा वेगळा असून, यासाठी आयुष विनोद गिरी याने विशिष्ट वेबसाईट वर पेरियॉडिक टेबल मधील 125 एलिमेंट्सच्या पठणाचा व्हिडिओ (40 सेकंद) रेकॉर्ड करून अपलोड केला व पुढील सूचनेनुसार एक एक टप्प्यावर तो व्हिडिओ पुढे गेलेला आहे प्रसार माध्यमांच्या साहाय्याने त्याचा हा व्हिडिओ वर्ल्ड बुक रेकॉर्ड, येथे पोहोचला व त्याच्या या अद्भुतविक्रमाची नोंद घेत त्याचा गौरव करण्यात आला. या साठी आयुष यास इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड तर्फे प्रशस्ती पत्र सुवर्ण पदक व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. या विश्व विक्रमासाठी आयुष यास त्याचे आई सौ. योगिता, वडील विनोदकुमार गिरी व शिक्षक इंगोले सर यांनी मार्गदर्शन केले.अभ्यासक्रमात आयुष शाळेच्या अव्वल असून होमी भाभा परीक्षेत पहिल्या व दुसऱ्या पात्रता फेरीसाठी त्याची निवड झाली होती. कारंजा एज्युकेशन सोसाटीच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सचिव यांनी चि. आयुष विनोद गिरी याचे अभिनंदन केले.




## नागभीड तालुका काँग्रेस कमेटीची आढावा बैठक संपन्न

महाराष्ट्र जीत :प्रतिनिधी

आज दिनांक २४/०४/२०२५ ला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटीचे प्राताध्यक्ष मा.श्री.हर्षवर्धनजी सपकाळ यांचे निर्देशनानुसार राज्यातील संघटक मजबुत करणेसाठी चंद्रपूर जिल्हा निरीक्षक मा.आ.अभिजितजी वंजारी, व चंद्रपूर जिल्हा प्रभारी मा.श्री.मुजीबभाई पठाण, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस महासचिव डॉ. अविनाशभाऊ वारजूकर यांचे प्रमुख उपस्थितीत नागभीड तालुका काँग्रेस कमिटीची आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी मा.आमदार अभिजितजी वंजारी साहेब यांनी काँग्रेस पक्ष कशाप्रकारे पूढे नेता येईल व येणाऱ्या ग्रा.पं असो वा नगरपरिषद, जि.प.निवडणूकीसाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे. यावेळी मुजीबभाई पठाण व मा.आ.डॉ. अविनाशभाऊ वारजूकर यांनी सुध्दा काँग्रेस पक्ष बळकट करणेसाठी मार्गदर्शन केले. यावेळी चिमुर विधानसभा समन्वयक डॉ.सतिशभाऊ वारजूकर, तालुका काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष प्रमोदजी चौधरी,काँग्रेसचे जेष्ठ नेते पंजाबरावजी गावंडे,प्रफुलजी खापर्डे,अँड.दिगांबरजी गुरपुडे,डॉ. प्रा.मोहनजी जगनाडे, डॉ.रविंद्रजी कावळे,विनोदजी बोरकर,तालुका काँग्रेस कमेटीचे सचिव शरदजी सोनवणे,पुरूषोत्तमजी बगमारे,विजयजी अम्रुतकर,प्रा.डॉ.संदिपजी सातव,विलासजी लांजेवार,प्रविणजी खोब्रागडे, अशोकजी वारजूकर, मधुकरजी बावणकर,पुरूषोत्तमजी राऊत,अमोलजी वानखेडे,वसमीभाई छुकारिया, रविंद्रजी बळी,प्रशांतजी गेडाम,गोपालजी म्हस्के,दिपकजी गिरिपुंजे,गजाननजी उरकुडे,भुपेशजी कोरे, चिमुर विधानसभा महिला काँग्रेस अध्यक्षा नितुताई गुरपुडे,महिला काँग्रेस शहर अध्यक्ष सुनिताताई डोईजड, माजी नगरसेवक नरेंद्रजी हेमणे,प्रतिक भसीन, माजी नगरसेविका आशाताई गायकवाड, मालाताई मुळे,योगिताताई मिसार,शमा शेख,संजयजी माकोडे,अमोलभाऊ बावणकर, कुणालजी मुलमुले,संकेतजी वारजूकर,संजयजी मोहरकर,अमरजी. नवघडे,मंगेशजी मेश्राम,संतोषजी सोनुले,मुन्नाजी राऊत, श्रीकृष्णजी श्रिरामे, तसेच काँगेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




## शासनाने पारित केलेला हिंदी सक्तीचा निर्णय अखेर रद्द केल्याने मनसेचा वाशिम मध्ये जल्लोष

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

वाशिम - केंद्र सरकार व राज्य सरकारने जे हिंदी सक्तीचा आदेश पारित केला होता त्या विरोधात महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने राज्यभरात निषेध करण्यात आले होते.व रोडवरती उतरून आंदोलन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने आज दिनांक 21 4 2025 रोजी सरकारने हिंदी सक्ती चा आदेश मागे घेतला त्या अनुषंगाने छत्रपती शिवाजी चौक येथे महाराजांना हार अर्पण करून मोठ्या जल्लोषात महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने मनसे जिल्हाध्यक्ष राजू पाटील किडसे यांच्या नेतृत्वात पती शिवाजी महाराज चौक वाशीम येथे फटाके फोडून आनंद साजरा करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले.यावेळी उपस्थित वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष गजानन वैरागडे सामाजिक कार्यकर्ते रामभाऊ बाजड वाशिम शहराध्यक्ष शिवाभाऊ इंगोले वाशिम शहर उपाध्यक्ष गजानन इंगोले वाहतूक सेना शहराध्यक्ष उमेश टोलमारे वाहतूक सेना सहचिटणीस देविदास जयताडे निखिल बुरकुले वाशिम मंगरूळपीर जिल्हा उपाध्यक्ष नरेंद्र भोयर वाहतूक सेना जिल्हा संघटक गजानन काढणे वाशिम शहर उपाध्यक्ष बबलू गायकवाड मालेगाव तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर गवळी मालेगाव शहराध्यक्ष अनिकेत शेट्टे इत्यादी होते.



## कबड्डी असोसिएशनच्या तालुकाध्यक्षपदी अमोल गोटे यांची निवड; जिल्हाभरात होत आहे अभिनंदन

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

वाशिम - येथून जवळच असलेल्या ग्राम तोंडगाव येथील कबड्डीसाठी अहोरात्र झटणारे राष्ट्रीय खेळाडू अमोल गोटे यांची नुकतीच कबड्डी असोसिएशनच्या वाशिम तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. तिवळी येथे बळीराजा अखिल भारतीय कबड्डीचे शिकायचे आयोजन करण्यात आले होते.यादरम्यान भारतीय कबड्डी फेडरेशनचे महासचिव जितेंद्र ठाकूर यांनी त्यांची एका नियुक्ती पत्राद्वारे निवड केली आहे.यावेळी आमदार अमित झनक यांनी अमोल गोटे यांचा सत्कार केला. तसेच यावेळी वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती माधवराव काकडे,रामभाऊ नवघरे, सतीश डफडे,पद्माकर देशमुख, मोहन चौधरी,साहेबराव घुले, भागवतराव महाले, माणिकराव खराटे, राजू आढाव,नागोराव भडांगे,दिलीपराव पवार,विनोद भेंडेकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.अमोल गोटे हे प्राध्यापक प्रवीण गोटे यांचे बंधू आहेत त्यांनी राष्ट्रीय कबड्डी संघासाठी नेतृत्व केले होते राष्ट्रीय स्तरावर कबड्डीसाठी त्यांचे उल्लेखनीय कार्य असल्याने त्यांना तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. यांच्या या निवडीचे जिल्हाभरात अभिनंदन होत आहे व त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



## नांदेडात आज सरपंच पदाची सोडत ; तहसिल निहाय निवड होणार जाहीर

महाराष्ट्र जीत : दिलीप मादाळे

नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत आज रोजी होणार आहे. या संदर्भात जिल्हा प्रशासनाने ठेवला चोख बंदोबस्त. 5 मार्च 2025 ते 4 मार्च 2030 दरम्यान नांदेड जिल्ह्यात सार्वत्रिक निवडणुकीद्वारे गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी हे आरक्षण लागू असणार आहे.

नांदेड जिल्हयातील सर्व 16 तालुक्यामध्ये आज रोजी प्रत्येक तहसिल स्तरावर प्राधिकृत अधिकारी तथा तहसिलदार यांच्याद्वारे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व ना.मा.प्र पदाकरिता महिला आरक्षणासह सरपंच पदाकरिता सोडत कार्यक्रम संबंधित तहसिलदार यांच्या अधिपत्याखाली संबधीत तालुक्यांच्या उपविभागीय अधिकारी यांच्या नियंत्रणात पुढील प्रमाणे पार पडणार आहे. सर्व संबंधित नागरिकांनी व ग्रामपंचायत सदस्यांनी सदरचे सोडतीस उपस्थित राहण्याचे जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडून आवाहन करण्यात येत आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व ना.मा.प्र. पदाकरिता महिला आरक्षणासह सरपंच पदासाठी हे आरक्षण जाहीर केले जाणार आहे. आरक्षणासाठी सोडत पुढीलप्रमाणे असेल. नांदेड व अर्धापूर तालुका उपविभागीय अधिकारी नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार नांदेड व अर्धापूर यांच्या कार्यालयात अनुक्रमे सकाळी 10 व दुपारी 3 वा. भोकर व मुदखेड तालुक्यासाठी उपविभागीय अधिकारी भोकर यांच्या नियंत्रणात भोकर व मुदखेड येथे तहसिल कार्यालयात अनुक्रमे सकाळी 10 व दुपारी 3 वा. उपविभागीय अधिकारी हदगाव यांच्या नियंत्रणात हदगाव व हिमायतनगर तहसिलमध्ये अनुक्रमे सकाळी 10 व दुपारी 3 वा. किनवट व माहूर तालुक्यासाठी उपविभागीय अधिकारी किनवट यांच्या नियंत्रणात किनवट व माहूर येथे अनुक्रमे सकाळी 10 व दुपारी 3 वा. धर्माबाद व उमरी तहसिलसाठी उपविभागीय अधिकारी धर्माबाद यांच्या नियंत्रणात तहसिल धर्माबाद व उमरी येथे अनुक्रमे सकाळी 10 व दुपारी 3 वा., बिलोली व नायगाव खै. तहसिलसाठी उपविभागीय अधिकारी बिलोली यांच्या मार्गदर्शनात तहसिलदार बिलोली तहसिलदार नायगाव खै. तहसिलसाठी अनुक्रमे सकाळी 10 व दुपारी 3 वा., देगलूर व मुखेड तहसिलसाठी उपविभागीय अधिकारी देगलूर यांच्या नियंत्रणात तहसिलदार देगलूर व मुखेड येथे अनुक्रमे सकाळी 10 व दुपारी 3 वा., कंधार व लोहा तालुक्यासाठी उपविभागीय अधिकारी कंधार यांच्या नियंत्रणात तहसिल कंधार व लोहासाठी अनुक्रमे सकाळी 10 व दुपारी 3 वा. आरक्षणाची सोडत निघणार आहे. सर्व सोडती सकाळी 10 व दुपारी 3 वा. त्या-त्या तहसिलमध्ये होणार आहेत.

